# महाराष्ट्र शासन

दु.क्र.२२८३९९२४
E-mail: sopr2.rdd-mh@nic.in

क्र.ग्रापंनि -२०२०/प्र.क्र.१८/पंरा-२
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : १२ मे, २०२०.

प्रति,

जिल्हाधिकारी,
सर्व.

विषय :-ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत सरपंच व उपसरपंच निवड होणेस मार्गदर्शन मिळण्याबाबत.

संदर्भ:- जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचेकडील क्र. कार्या-१२ब /ग्रांप/ आरआर/१०८/२०२०, दिनांक ६/५/२०२० रोजीचे पत्र.

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणूका २०२० करोना विषाणू-कोव्हिड -१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निवडणुकीशी संबंधित कामकाज, आहे त्या टप्प्यांवर स्थगित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १७.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सर्व यांना कळविले आहे.

कोल्हापूर जिल्हयातील ग्रामपंचायतीकडून सरपंच व उपसरपंच निवडीबाबत वारंवार विचारणा होत असून ग्रामपंचायतींच्या मासिक सभेत सरपंच व उपसरपंच यांच्या राजीनाम्याचे वाचन झाल्यानंतर सरपंच व उपसरपंच निवडीच्या आदेशाकरीता जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केले जात आहेत. ग्रामपंचायतींनी घेतलेल्या मासिक सभेमध्ये सरपंच व उपसरपंच हे निवडणूक विषयक कामकाज घ्यावे अगर कसे याबाबत मार्गदर्शन मिळणेसाठी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी शासनास संदर्भिय पत्रान्वये विनंती केली आहे.

यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, आपल्या जिल्हयातील सरपंच /उपसरपंच यांच्या राजीनाम्यामुळे किंवा इतर कारणाने रिक्त झालेल्या सरपंच व उपसरपंच पदाची निवड होणेसाठी ग्रामपंचायतीची बैठक घेण्यात यावी. याकरिता संबंधित तहसीलदार यांना निर्देश देण्यात यावेत व सरपंच व उपसरपंच यांची निवड करण्यात यावी. सदर बैठकी दरम्यान शासनाने कोव्हीड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणेबाबत संबंधिताना आवश्यक सुचना देण्यात याव्यात.

(अरविंद कुमार),भा.प्र.से.
अतिरिक्त मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- १.विभागीय आयुक्त, सर्व.
२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
३.उप आयुक्त, राज्य निवडणूक आयोग.
४.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद सर्व.
५.निवडनस्ती-पं.रा.-२.